# B.KUMAR'S ACADEMY

**विषय : मराठी** **एकूण गुण : 80**

**वर्ग : 10 (Eng. Med.) PRELIM QUESTION PAPER - 01** **वेळ : 3 तास**

### विभाग १ - गद्य १८ गुण

**प्र.१ (अ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** ७

रात्री दोन वाजता शेवटची गाडी इथून जाते. त्यानंतर पहाटेस कुणीतरी हा उपद्व्याप जाणीवपूर्वक केला असावा. आता प्रवाशांनी भरलेली नऊ पन्नासची गाडी येईल. निरंजन एकदम सावध झाला. गाडी आली तर भयंकर अपघात होईल, हे त्याच्या लक्षात आलं. निरंजन नागरिकशास्त्राचा पेपर, देशमुखांकडचं जेवण सारं विसरला. त्याच्या डोळ्यांसमोर धाड्धाड् आवाज करत येणारी रेल्वे गाडी दिसू लागली. कानठळ्या बसवणारा आवाज आणि लोकांच्या किंकाळ्या कानांत घुमू लागल्या, स्टेशन इथून खूप दूर होतं. तीन-चार किलोमीटर तिथपर्यंत सांगायला जायचं तर परीक्षा बुडणार होती. मग नापास भडसावळे गुरुजींची मदत बंद, शिक्षणही बंद, रेल्वेने फिरायचं स्वप्न अपुरंच राहणार होतं; परंतु मन मानायला तयार नव्हतं. त्याने क्षणभर विचार केला आणि स्टेशनच्या दिशेने धाव घेतली. तो स्टेशनात शिरला तेव्हा नऊ पन्नासची गाडी नुकतीच आली होती. आता पाच मिनिटांतच ती सुटणार होती.

निरंजनने धावतच स्टेशनमास्तरांना गाठलं. त्यांना पुलावरच्या खराब झालेल्या रुळांबद्दल सांगितलं; पण ते त्यांना खरंच वाटेना. अखेर निरंजनने आर्जवं केली, की निदान पाहून आल्याशिवाय तरी गाडी सोडू नका. मी खोटे बोलत असेन, तर मला पोलिसांच्या ताब्यात द्या. एवढं बोलल्यावर स्टेशनमास्तरांनाही त्याच्या बोलण्यात तथ्य वाटू लागलं. उगाच धोका नको म्हणून गाडी थांबवायला सांगून ते पुलाकडे निघाले. निरंजनने नेमकी जागा दाखवली.

**1.A1) आकृती पूर्ण करा.** २

परीक्षा बुडल्याचा निरंजनवर होणारा परिणाम

(रिकाम्या चौकटी: १. ____ २. ____ ३. ____ ४. ____)

**A2) कारणे लिहा.** २

स्टेशन तीन-चार किलोमीटर दूर होते तरी परीक्षा बुडवून तो तिकडे गेला, कारण ....

**A3) स्वमत** ३

**तुम्हाला निरंजनशी मैत्री करायला आवडेल का व त्यांची कारणे लिहा.**

**(आ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** ७

कालच संध्याकाळी विश्राम गृहावर गप्पा मारताना टोंगेंनी मला त्या परिसरात चार पिलूं असलेल्या वाघिणीबद्दल सांगितलं होते. तेव्हा पासूनच मला कधी तिथे जातो असं झालं होतं. प्रचंड उष्णतेचे दिवस असल्यानं वाघासारखं जनावर पाण्याच्या आसपासच वावरतं. तशातच लहान पिलूं असल्यानं या वाघिणीला त्यांना पाण्यापासून जास्त दूर नेणंदेखील शक्य नव्हतं; पण लहान पिलूं असणारी वाघीण ही जंगलातलं सगळ्यात धोकादायक जनावर! पिल्लांच्या संरक्षणासाठी ही सजग आई, कुणाचा जीवदेखील घ्यायला

मागे-पुढे बघत नाही. त्यामुळे सुकलेल्या नाल्यात उतरताना माझ्या मनावर एक अनामिक दडपण आलं होतं. वाघीणअद्याप आपल्या पिल्लांसह याच परिसरात वावरत होती. आता मी ती पिलं बघायला चांगलाच अधीर झालो होतो. इथून सुमारे शंभर-सव्वाशे पावलांवर नाल्यात थोडंसं पाणी असल्याचं मला माहीतच होतं. ही वाघीण तिथंच सापडण्याची शक्यता होती. त्यामुळे आता तिकडं जाताना खूपच सावधगिरी बाळगणं आवश्यक होतं. जमिनीवर सर्वत्र पानगळीमुळे पडलेला वाळका पाचोळा साचून होता. त्या वरून पाय न वाजवता जाणं ही एक मोठीच कसरत होती.

पाणवठा जसा जवळ आला तसं माझं हृदय जोरजोरात धडधडू लागलं. पुढं काय दिसेल, या जाणिवेनंच माझा घसा कोरडा पडला. इतरांचीही अवस्था काही वेगळी नव्हती. आम्ही सगळ्यांनीच एकमेकांकडे बघत चौकस राहण्याची डोळ्यांनीच खूण करून सूचना केली. आता एकेक पाऊल टाकताना मनावरचं दडपण अधिकच वाढत होतं. कुठंतरी झाडाच्या बुंध्या आड, जांभळीच्या झुडपात लपलेली वाघीण रागानं गुरगुरत क्षणार्धात अंगावर येणार, असंच वाटत होतं. वाऱ्यानं हळूच होणारी पानांची सळसळदेखील मोठी वाटत होती. आता जणू सगळा काळच थांबला असावा असं वाटत होते.

**1.A1) कारणे लिहा** २

**i) लेखकाच्या मनावर एक अनामिक दडपण आलं कारण-**

**ii) लेखकाचे ऱ्हदय धडधडू लागले कारण-**

**A2) घटनेनुसार वाक्यांचा क्रम लावा.** २

i) जाताना सावधगिरी बाळगणं आवश्यक होतं

ii) पाय न वाजवता जाणं ही मोठी कसरत होती.

iii) वाघीण तिथचं सापडण्याची शक्यता होती.

iv) जमिनीवर सर्वत्र पागळीमुळे पडलेला वाळका पाचोळा साचून होता.

**A3) स्वमत.** ३


'वाऱ्यानं हळूच होणारी पानांची सळसळदेखील मोठी वाटत होती' या विधानाचे लेखकाच्या मनावर दडपण का आले होते?

### अपठित गदय

**(इ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** ४

मुंग्या तिला म्हणू लागल्या, 'बरं झालं बाई, उरकलं तुझं सगळं वेळेत. एकदा का पाऊस सुरू झाला की वाहून जाणार हे वारूळ. मग कसं झालं असतं तुझं? नागीण म्हणाली, हो ना बाई, तुम्ही सगळ्या होतात, म्हणून निभावलं हो. पोरापोरांची दोस्ती झाली. मुंग्यांची पिलं नागाच्या पिल्लांना बाहेर घेऊन जात, आसपासचे रस्ते माहीत करून देत. नागाची पिलं आईला पाहिलेल्या सगळ्या गमती-जमती येऊन सांगत. त्यांना जेव्हा कळलं, आता पावसाळा येणार आणि आपल्या घरात पाणी शिरून ते वाहून जाणार, तेव्हा ते हबकलेच. 'पण असं का?' 'तसंच असतं. हे दरवर्षीचं आहे. आपण बाहेर पडायचं आणि बघायची जागा सापटीची, वळचणीची. जी असेल कोरडी आणि माणसाच्या दृष्टीने अडनिडी' एका हुशार पोरानं सुचवलं की, या मुंग्यांना आपण वारूळाची रचना बदलायला सांगितली तर? म्हणजे पाणी आतच येऊ नये.' 'नाही रे बाळा, ते त्यांचं चालत आलेलं शास्त्र आहे. वर्षानुवर्षे तेच चालत आलंय.' पण माणसं बघ. त्यांच्याकडनं काही शिकायला नको का आपण प्राण्यांनी? मुंग्यांना आपण सुचवूयात की, मातीत सिमेंट मिसळा योग्य प्रमाणात की, होतील आपली घरं परमनंट, अगदी माणसांच्या घरांसारखी. पाहिजे तर बाहेरनं वॉटर रूफिंगही करता येतं आजकाल. म्हणजे कितीही येऊ देत पाणी, बाहेरच्या बाहेर वाहून जाईल. शिवाय ही वर तोंड केलेली उघडी भोक, त्याने सगळा घोटाळा होतोय. ते डिझाईन पणबदलायला हवे...'

**1. A1) उत्तरे लिहा.** २




B KUMAR'S ACADEMY

**A2) खालील शब्दसमूहांचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.** २

**i) मुंग्यांचे निवासस्थान -**


**ii) एकाच ठिकाणी टिकून राहणारा -**

## विभाग २ - पदय १६ गुण

**प्र.२ (अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** ८

झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत
धारण करून तपश्चर्या करत...
पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं
मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट
सहन करते
झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब
झाडाकडे टक लावून पाहिलं तर
शरीरभर विरघळतो हिरवा रंग
रक्त होते क्षणभर हिरवेगार
आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं
टवटवीत
झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिराना
कवेत घेण्यासाठी
पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण
करतं नव्या नवरीसारखं
झाडाला पालवी फुटल्यावर फुटते शरीरभर
पालवी
अन झटकली जाते मरगळ
पक्ष्यांच्या मंजुळ नादात झाडाचंही जीवनाचे
एक संथ गाणे दडलेले असते
हसावं कसं सळसळत्या पानासारखं
मुळावं मुरावं कसं तर? झाडासारखं घट्ट पाय
रोवीत
जगावं कसं तर? हिरवंगार झाडासारखं
रोजचं चिंतन करावं कसं तर झाडासारखं!

**1. A1) आकृती पूर्ण करा.** २




**A2) एका वाक्यात उत्तर लिहा.** २

**i) झाडाच्या जीवनाचं गाणं कशात दडलेलं असतं?**

**ii) झाडाच्या मुळावर घाव घातल्यावर त्याची प्रतिक्रिया काय असते?**

**A3) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा.** २

i) सरसावणे -

ii) मुसाफिर -

iii) कवेत -

iv) पानझड -

**A4) स्वमत** २

'झाडापासून आनंदी जगणे शिकावे', या विधानातील विचार स्पष्ट करा.

**आ) दोन दिवस किंवा योगी सर्वकाळी सुखदाता** कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा. ८

**(१) दोन दिवस**

(१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री - १

(२) प्रस्तुत कवितेचा विषय - १

(३) प्रस्तुत कवितेतील दिलेल्या दोन ओळींचा सरळ अर्थ लिहा. २

झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे
आयुष्य छान शेकले.

(४) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश – २

(५) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण २

किंवा

(२) योगी सर्वकाळ सुखदाता

(१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री -

(२) प्रस्तुत कवितेचा विषय -

(३) प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा -

जन निववी
श्रवणकीर्तनें।
निजज्ञानें उद्धरी।।

**(४) प्रस्तुत कविता आवडण्याचे व न आवडण्याचे कारण.**

**(५) प्रस्तुत शब्दांचा अर्थ**

i) उदक -

ii) मधुर -

iii) तृषित -

iv) क्षाळणे -

B KUMAR'S ACADEMY

### विभाग ३ - स्थूलवाचन ६ गुण

**प्र.३ खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.** ६

१) 'पाणी हेच जीवन !' या विधानासंबंधी तुमचे विचार लिहा.

२) 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते ते पाठाच्या आधारे लिहा.

३) सूर्यास्ताच्या दर्शनाने मनात निर्माण होणा-या मानवी भावभावना स्पष्ट करा.

### विभाग ४ - भाषाभ्यास १६ गुण

**प्र.४(अ)व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.** ८

**(१) वाक्यांचे प्रकार ओळखा -** २

i) हळूहळू सगळ्या शाली वाटून टाकल्या, गरीब श्रमिकांना !

ii) तू चित्र काढ.

**(२) वाक्यरुपांतर -** २

१) ते काम लहान नाही. (होकारार्थी करा)

२) शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी खूप काही केले. (प्रश्नार्थक करा)

**(३) खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा. (फक्त २)** ४

१) नाव उज्ज्वल करणे

२) मांडणी करणे -

३) डोळे भरून पाहणे -

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.** ८

**(१) शब्दसंपत्ती -**

**i) लिंग बदला.** १

शिक्षक -

विद्यार्थी –

**ii) विरुद्धार्थी शब्द लिहा.** १

i) प्रामाणिक-

ii) सावध -

**iii) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** १

i) तीन महिन्यात एकदा प्रकाशित होणारे -

ii) ज्याला घरदार नाही असा

**iv) वचन बदला.** १

किस्सा -

कल्पना -

**(२) लेखननियमांनुसार लेखन -**

**लेखननियमांनुसार बदल करा.** २

**१) इथले शीक्षक मनाने खुप श्रीमंत होते.**

**२) वाघीणीनं नाला पार करून बांबुच्या गंजीत पाय ठेवला.**

**(३) विरामचिन्हे -** २

१) विरामचिन्हांचा योग्य वापर करा.

आईच्या आजीच्या तोंडून इसापनीती पंचतंत्र अकबर बिरबल अशा गोष्टी ऐकत ऐकत तुम्हांला मला वाचायची सवय लागते ना

**२) विरामचिन्हांचा योग्य वापर करा.**

केवढी उंच इमारत ही

### विभाग ५ - उपयोजित लेखन २४ गुण

**प्र. ५ कोणतेही एक कृती सोडवा**

**अ) १. पत्रलेखन -** ६

**खालील विषयावर पत्र लिहा.**

'झाडे लावा....झाडे जगवा'

**हिरवाई ट्रस्ट, तळेगांव दाभाडे**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त



रोपांचे मोफत वाटप

रविवार, दि. ५ जून २०२४

वेळ - सकाळी ९ ते १२

**संपर्क** - हिरवाई ट्रस्ट, बालोद्यान मार्ग, तळेगांव दाभाडे

ई- मेल - hirvaitrust@gmail.com

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

(अ) शाळेत वृक्षारोपण करण्यासाठी रोपांची मागणी करणारे पत्र लिहा

(ब) चांगल्या उपक्रमाबाबत हिरवाई ट्रस्टचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

खालील निदेवन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा

(अ) शाळेत वृक्षारोपण करण्यासाठी रोपांची मागणी करणारे पत्र लिहा.

(ब) चांगल्या उपक्रमाबाबत हिरवाई ट्रस्टचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**किंवा**

B.KUMAR'S ACADEMY

A-1, Ground Floor, Green Park Building Shastri Nagar, near Indian Overseas Bank,
Vasai West, Vasai-Virar, Maharashtra 401202 **+91 9619619937, 0250-2334511**

**सारांशलेखन -**

**विभाग १ - गदय प्र. १ (इ) उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती करा. १०**

1) **जाहिरात लेखन :**

पुढील विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा.

दुरचित्रवाणी - बाजारात संदेशवाहिनीची जाहिरात तयार करा.

**(२) कथालेखन (८० ते १०० शब्द)**

**पुढील शब्दांच्या आधारे कथा लिहा.**

लक्ष्मण नावाचा तरुण ........ कैदेत ........ गावप्रमुखाचे कैदखान्याचे निरीक्षण करणे........ लक्ष्मणची सुटकेसाठीची विनंती ........ सुटका व आर्थिक मदत ........ लक्ष्मण पक्षी घेऊन बाजारात ........ सर्व पक्षी पिंजऱ्यासहित विकत घेणे ........ पक्षी विक्रेत्याच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह........पक्ष्यांची पिंजऱ्यातून मुक्तता........ मुक्ततेचा आनंद ........ बोध.

**(३) बातमीलेखन (८० ते १०० शब्द)**

**खालील निवेदन वाचून बातमी तयार करा.**

**अभिनव विदयालय, नागपूर**

**'भव्य विज्ञान प्रदर्शन' संपन्न**

दि. १५ ऑक्टोबर ते १८ ऑक्टोबर

वेळ स. ११ ते सं. ५ वाजेपर्यंत

**अध्यक्ष** - श्री सुहास माने

**प्रमुख पाहणे** - श्री आशिप वाघ

* एकूण ५० शाळांचा सहभाग
* उद्घाटन सोहळा संपन्न
* उत्कृष्ट प्रकल्पांना पारितोषिके
* विज्ञान नाटिका सादर

**(इ) लेखनकौशल्य ८**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणत्याही एक कृती सोडवा. (शब्दमर्यादा १०० ते १२० शब्द)**

1) **प्रसंग लेखन :**

निरोप समारंभ इ.१० वी

- दि.२० फेब्रुवारी दुपारी ४ वाजता
- ज्ञानसंवर्धन विद्यालय, अमरावती
- शिक्षकांची मनोगते
- शालेय आठवणींना उजाळा
- विद्यार्थ्यांची मनोगते

वरिल प्रसंगी तुम्ही उपस्थित होता अशी कल्पना करून त्या प्रसंगाचे लेखन करा.

२) **खालील मुद्द्यांच्या आधारे सैनिकाचे आत्मकथन लिहा.**

सैनिकाचे आत्मकथन

- सैनिक होण्याचा निश्चय
- खडतर प्रशिक्षण
- शौर्य गाजवण्यासाठी संधी
- ध्येयपूर्ती
- खंत

3) **वैचारिक :**

**खालिल विषयावर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे लेखन करा.**

'मी माझ्या देशाचा नागरिक' या विषयावर तुमचे विचार मांडा

***

KUMAR'S ACADEMY

विषय : मराठी | एकूण गुण : 80

वर्ग : 10 (Eng. Med.) **PRELIM QUESTION PAPER - 02** वेळ : 3 तास

### विभाग १ - गद्य १८ गुण

**प्र.१ अ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.७**

कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा संमेलने गाजवित. पुढे ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही झाले. परिणामत: त्यांच्या कार्यक्रमांना अहोरात्र भरतीच असे. प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल व श्रीफळ त्यांना मिळत राही. एकदा ते मला म्हणाले, ''या शाली घेऊन घेऊन मी आता 'शालीन' बनू लागलो आहे''.

त्यांच्या बोलण्यातील उपरोधिक खोच माझ्याच नव्हे तर कोणाच्याही सहजपणे लक्षात येणारी होती. शाल व शालीनता यांचा संबंध काय? खरे तर, खरीखुरी शालीनता शालीविनाच शोभते! सुर्वे मुळातच शालीन. शालींच्या वर्षावाखाली त्यांची शालीनता कधी हरवली नाही, कधी क्षीणही झाली नाही.

मी कविवर्यांना म्हटले. ''शालीमुळे शालीनता येत असेल तर मी कर्जबाजारी होईन. भिकेला लागेन; पण शेकडो शाली खरेदी करून सर्वांना एकेक शाल लगेचच नेऊन देईन.'' यावर तो शालीन कवी मनापासूनहसला. शालीमुळे शालीनात येते की जाते? या प्रश्नाचे माझे उत्तर 'जाते' असेच आहे. सन्मान करण्याच्या रूपाने आपण खरे तर एक शालीन जग गमावून बसण्याचा धोकाच मोठा आहे.

मी २००४ साली मराठी साहित्यसंमेलनाचा बिनविरोध अध्यक्ष झालो. तत्कालीन एक-दोन वर्षात माझ्यावर शालींचा वर्षाव झाला. एवढ्या शाली जमत गेल्या की माझ्या आठ बाय सहाच्या खोलीत त्यांना ठेवणेच शक्य नव्हते. मग मी सगळ्या शालींचे गोठोडे बांधून ते निकटवर्ती मित्राकडे ठेवले व त्या शाली वापरण्याचे वगैरे त्याला सर्वाधिकार दिल. बिचारा अतिप्रामाणिक! त्याच्याही छोट्या खोलीत त्याने ते सांभाळले.

हळूहळू मी सगळ्या शाली वाटून टाकल्या, गरीब श्रमिकांना! याच सुमारास मी शनिवार पेठेतील ओंकारेश्वर मंदिराच्या पुलावर बहुधा रोज संध्याकाळी जात असे. तेथील कट्ट्यावर बसणे मला आवडे. एक दिवस काय घडले, की कडक थंडीच्या दिवसात एक म्हातारा, अशक्त भिक्षेकरी कट्ट्याला लागूनच चिरगुटे टाकून व पांघरून कुडकुडत बसल्याचे मी पाहिले.

दुसऱ्या दिवशी मी दोन शाली घेऊन ओंकारेश्वराच्या कट्ट्यावर आलो. तो म्हातारा होताच. त्याला दोन्ही शाली दिल्या. त्याने थरथरत्या हातानी मला नमस्कार केला.

**A1) एका वाक्यात उत्तर लिहा.** २

**i) लेखक फिरण्यासाठी कोठे जात?**

**ii) लेखकाच्या आवडीची गोष्ट कोणती?**

**A2) रिकामी जागा भरा.** २

**i) शालीमुळे शालीनता ......... की ......... ?**

**ii) मराठी साहित्य संमेलनाचा ......... अध्यक्ष झालो.**

**iii) मी तुम्हाला ......... शाली दिल्या होत्या.**

**A3) स्वमत :** ३

**सन्मानाचे प्रतीक शाल याविषयी तुमचे विचार लिहा.**

**आ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.७**

सुमितनं पावडेकाकांचा डेटा ॲपमध्ये भरायला सुरू केला.

''काका, आता तुम्ही कुठून आलात ?''

''विश्रांतवाडीहून.''

''कसे?''

''अर्थातच, कारने.''

''वीस किलोमीटर कारने. तुम्ही एकटेच...!' सुमितची शंका

''हो, का?''

"अच्छा, पण काका आठवड्यातून तुमच फिरणं किती होतं ?"

"अरे, माझं ऑफिसच माझ्या घरापासून १६ किलोमीटर आहे. रोजचे पस्तीस-चाळीस किलोमीटर तर नक्कीच होतात."

"आणि हे सगळं कारनं... तुम्ही एकटेच ये-जा करता?"

"हो, नाही तर काय बसला लटकत जाऊ म्हणतोस?" काका चिडून म्हणाले.

"काका, तुम्ही काही झाडं लावली आहेत का?"

"पावडेकाकूंनी कुंडीतल्या रोपांकरता माती मागितली तर ती आणून देणं होत नाही काकांना, ते झाडं काय लावणार?"

स्नेहलनं एकदम स्ट्रेट ड्राईव्ह लगावला. सुमितनं पावडेकाकांची आणखी काही माहिती घेतली आणि ॲपवर भरली. पुन्हा निळा तुकडा चमकला आणि काही क्षणातच त्या निळ्या तुकड्यावर पावडेकाकाची पावलं उमटली.

दोन काळीकुट्ट पाऊलचिन्हे!!

आणि खाली शब्द आले

'सॉरी, यू हॅव डर्टीएस्ट फूटप्रिन्टस.

**A1) चौकटी पूर्ण करा.** २

**i) पावडेकाका या ठिकाणाहून आले होते -** ☐

**ii) पावडकाकांचे प्रवासी वाहन -** ☐

**iii) विश्रातीवाडी ते सुमित घर यतिल अंतर -** ☐

**iv) पावडेकाकांचे ऑफिस व घरतील अंतर -** ☐

**A2) सत्य की असत्य ते लिहा.** २

**i) पावडेकाकांना वृक्षरेपणाची आवड होती.**

**ii) पावडकाका नेहमी बसने प्रवास करत.**

**iii) पावडेकाकांचे ऑपुिस घरापासून १६ किलोमीटर आहे.**

**iv) स्नेहलनं पावडेकाकांचा डेटा ॲपमध्ये भरला.**

**A3) स्वमत :**

**शालेय शिक्षणात ॲपचा वापर' यावर तुमचे विचार लिहा.**

B.KUMAR'S ACA

## अपठित गद्य

**इ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.४**

लहानपणी जशी बालसुलभ बुध्दीला स्वप्ने पडतात, तशी स्वप्ने सुनीताला पडायची. नील आर्मस्ट्रॉंगला चंद्रावर चालताना पाहून 'वा! छान. आपल्यालाही असंच काहीतरी अचाट करायचंय!' असे उद्गार तिने लहानपणी पशूवैद्यकतज्ज्ञ व्हायचे ठरवले होते, पण तिची ती इच्छ पूर्ण झाली नाही. लहानपणी ती वडिलांकडून 'इचक दाना बीचक दाना' हे गाणे शिकली तसेच रामायण-महाभारतातल्या गोष्टी ऐकल्या. सुनीता अभ्यासात फार हुशार नव्हती. तिला लहानपणापासूनच पोहण्याची अत्यंत आवड होती. शाळेशिवायच्या मोकळ्या वेळात ती स्विमिंग टँकवर पोहत असायची. त्यामुळे उरलेल्या वेळात होमवर्क व इतर गोष्टीची तारांबळ व्हायची. पंड्या कुटूंब सहलीला गेले तरी तिथ सुनीताचा पोहण्याचा नाद सुटला नाही. याच काळात जमिनीवर पाय न ठेवता सहज पाण्यात तरंगत राहण्याची सवय तिच्या शरीराला लागली. पोहण्याप्रमाणेच ॲथेलेटिक्स, ट्रायथलॉन स्पर्धांमध्ये तिने जम बसवला. पुढे ती मॅरेथॉनमध्येही धावली.

**A1) चौकटी पूर्ण करा.** २

सुनीताने या स्पर्धांमध्ये भाग घेतला

☐ ☐ ☐ ☐

**A2) आकृती पूर्ण करा.** २

**i)** परिच्छेदात आलेल्या दोन पौराणिक ग्रथांची नावे

☐ ☐

**ii) चौकटी पूर्ण करा.**

**लहानपणी सुनीताने वडिलांकडून ऐकलेले गाणे -** ☐

**विभाग २ - पद्य १६ गुण**

**प्र.२. अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** ८

फुलाफुलांचे दाट ताटवे, जिथे पोचते दृष्टी रंग मजेचे, रंग

उदयाचे, जपून ठेवू सृष्टी...
धान्य देईना संगणक हा, काळी आई जगवू मातीमध्ये जे
हात राबती, तयांस देऊ पुष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे
डोंगरातून वाहात येते, खळाळते हे पाणी फेनधवलशा
तुषारांमध्ये, राहाल कैसे कष्टी ?
रंग मजेचे, रंग उदयाचे
मिळेल पैसा, मिळेल दौलत, यंत्रांच्या संगती आभाळाच्या
छत्राखाली, एक अनोखी तुष्टी...
रग मजेचे रंग उदयाचे
हिरवी हिरवी मने भोवती, किती छटा हिरव्याच्या गर्भरेशमी
सळसळण्याच्या जगास सांगू गोष्टी रंग मजेचे, रंग उदयाच

**A1) चौकटी पूर्ण करा.** २

**i) कष्ट करणाऱ्यांना मदत करू या आशयाची ओळ लिहा -** [ ]

**ii) दौलत हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा -** [ ]

**A2) कवितेच्या आधारे कृती पूर्ण करा.** २

i) **दृष्टी - ...........**

ii) **पुष्टी - ...........**

iii) **कष्टी - ...........**

iv) **तृष्टी - ...........**

**A3) प्रस्तुत कवितेता शब्दाचा अर्थ लिहा.** २

i) **बिया - ...........**

ii) **डोंगर - ...........**

iii) **झाडे - ...........**

iv) **गच्च - ...........**

**A3) काव्यसौंदर्य :** २

**फुलाफुलांचे दाट ताटवे, जिथे पोचते दृष्टी**
**रंग मजेचे रंग उद्याचे, जपून ठेवू सृष्टी.**

**आ)** ८

**रंग मजेचे, रंग उद्याचे व स्वप्न करु साकार**

**कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.**

**१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री -**

**२) प्रस्तुत कवितेचा विषय -**

**३) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश -**

**४) प्रस्तुत कविता आवडण्याचे व न आवडण्याचे कारण-**

**५) प्रस्तुत कवितेतील दिलेल्या शब्दांचा अर्थ लिहा.**

i) सृष्टी - ii) वृष्टी -

iii) दौलत - iv) तुष्टी -

**किंवा**

**स्वप्न करु साकार**

**१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री -**

**२) प्रस्तुत कवितेचा विषय -**

**३) प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा.**

**'हजार आम्ही एकी बळकट**
**सर्वांचे हो एकच मनगट'**

**४) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे.**

**५) प्रस्तुत शब्दांचे अर्थ लिहा.**

**i) विभव -** **ii) मंगल -**

**iii) श्रम -** **iv) हस्त -**


**v) तन -**

**विभाग ३ - स्थूलवाचन ६ गुण**

**प्र.३. खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.** ६

1) **'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते ते पाठाच्या आधारे लिहा.**

**2) खालील 'व्युत्पत्ती कोश' मुद्द्यांवर एक पारिच्छेद तयार करा. (७ ते ८ वाक्यांत)**




**3) मेटलायझिंग प्रक्रियेवर लेखक डॉ. अनिल काकोडकर यांनी कसे काम केले ते तुमच्या शब्दांत लिहा.**

**विभाग - ४ भाषाभ्यास १६गुण**

B.KUMAR'S ACADEMY

**प्र.४ . अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.**

**१) वाक्यांचे प्रकार ओळखा -** २

i) काय नाटक आहे हे ?

ii) निरंजन उदास मनाने घरी परतला.

**२) वाक्यरूपांतर -** २

i) कथा ही कादंबरीची धाकटी बहीण आहे.
(नकारार्थी वाक्य करा)

ii) क्रिकेटचा खेळ छान खेळ. (उद्‌गारार्थी करा)

**३) खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यत २ उपयोग करा. (फक्त २)**

1) अंगावर सरसरून काटा येणे →

2) पारंगत असणे →

3) आनंद गगनात मावेना →

**आ) भाषिक घटकावंर आधारित कृती.**

**१) शब्दसंपत्ती -**

**i) लिंग बदला.** १

गृहस्थ - ............

घोडा - ............

**ii) विरूध्दार्थी शब्द लिहा.** १

i) प्रत्यक्ष × .................

ii) सुखी × .................

**iii) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** १

i) मूर्तीची पूजा करणारा → ................

ii) सूर्याचा होणारा उदय →.................

**iv) वचन बदला.** १

i) रस्ता - ................

ii) भिंत - ..................

**२)लेखननियमांनुसार लेखन -**

**लेखननियमांनुसार बदल करा.** २

**1) अब्दूलन एकवार तीच्याकडे बधितले**

**2) अशा परीस्थीतित माझी शाळा सूरू झाली.**

**3) विरामचिन्हे -**

**1) चुकीची विरामचिन्हे बदला**

**किती, सुंदर गाव आहे हे ?**

**2) विरामचिन्हांचा योग्य वापर करा.**


**मी कसे व्यक्त करणार**

## विभाग ५ - उपयोजित लेखन २४ गुण

**प्र.५. अ) 1) पत्रलेखन -** ६

**खालील विषयावर पत्र लिहा.**

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.**




**अ) स्पर्धेत सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र मुख्याध्यापकांना लिहा.**

**किंवा**

**ब) चांगल्या उपक्रमाबद्दल अभिनंदन करणारे पत्र लिहा.**

**किंवा**

**2) सारांश लेखन :**

विभाग 1 गद्य विभागातील प्र.1 इ मधील उताऱ्याचा 1/3 सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृति करा.** १०

**१) जाहिरातलेखन (६० ते ८० शब्द)**

**खालील शब्दांचा आधार घेऊन आकर्षक जाहिरात तयार करा.**

**प्लास्टीक पिशव्यांवर बंदी आली आहे. वर्तमानपत्राच्या कागदांच्या पिशव्या बनवून विकण्याचे ठरविले आहे. या पिशव्यांची जाहिरात तयार करा.**

B.KUMAR'S ACADEMY

२) **कथालेखन (८० ते १०० शब्द)**

**खालील अपूर्ण कथा पूर्ण करा.**

**(दिलेली अपूर्ण कथा लिहून घेण्याची आवश्यकता नाही.)**

राजू आठवडी बाजारात बांगड्या विकण्याचा व्यवसाय करत असे. आजही तो दर बुधवारप्रमाणे बांगड्या घेऊन बाजारात आला. बाजारात खूप गर्दी होती पण का कुणास ठाऊक आज राजूकडे एकही गिऱ्हाईक आलं नाही. 'धंदा चांगला झाला नाही तर लहान बहिणीचा नवीन फ्रॉकचा हट्ट कसा पुरवता येईल?' याची राजूला चिता होती. तिला हवा असलेला सुंदर लाल फ्रॉक थोडा महागच होता; पण उद्या तिच्या वाढदिवसाला तो फ्रॉक तिला घेऊन देण्याचे राजूने कबूल केले होते. संध्याकाळपर्यंत एकही गिऱ्हाईक न आल्याने राजू हिरमुसला होता. इतक्यात शेजारच्या गावातील श्रीमंत व्यापाऱ्याच्या घरी लग्न असल्याची बातमी त्याला समजली आणि ....

३) **बातमीलेखन (८० ते १०० शब्द)**

**साने गुरूजी विद्यालय, सोलापूर**

**भव्य वार्षिक क्रीडामहोत्सव संपन्न**

**प्रमुख पाहुणे:**

मा.सौ. अपर्णा भोसले

अध्यक्ष : मा.श्री. रोहित बर्वे

इयत्ता ५ वी ते ९ वी च्या सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग

कवायतीचे प्रकार

क्रीडा साहित्यावर आधरित नृत्य प्रकार बक्षिस समारंभ

मल्लखांबाचे प्रकार

लेझीम नृत्य

इ) **लेखनकौशल्य** ८

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणत्याही एक कृती सोडवा. (शब्दमर्यादा १०० ते १२० शब्द)**

1) **प्रसंगलेखन : दिलेल्या समारंभ प्रसंगी तुम्ही लहान भावाचे/ बहिणीचे कौतुक करण्यासाठी उपस्थित होता अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.**

**आदर्श मंडळ**

**योगासने प्रात्यक्षिक स्पर्धा**

**(२ ते १२ वयोगटासाठी)**

**पारितोषिक वितरण समारंभ**

**दिनांक २ जानेवारी**

**सकाळी : ९ : ००**

**प्रमुख पाहुणे - श्री उदय जैन**

**अध्यक्षा - श्रीमती अनुराधा रेगे**

2) **खालील मुद्दे विचारात घेऊन 'अकस्मात पडलेला पाऊस' किंवा 'पावसाळ्यातील एक दिवस या विषयावर प्रसंगलेखन करा.**

**(मुद्दे : पावसापूर्वीच वातावरणात झालेला बदल - पावसाला सुरूवात - जनजीवनावर परिणाम - अविस्मरणीय अनुभव)**

३) **वैचारिक :**

यंत्र - आमचा मित्र का शत्रू ?

मुद्दे :

| | |
|---|---|
| यंत्राचा उपयोग अटळ | दोन्ही बाजूंनी भिन्न विचारसरणी |
| यंत्राचा शोध लागल्याने बेकारी वाढली | अपघातांचे खरे कारण |
| उत्पादन वाढले | यंत्र आमचा मित्रच |
| विकास होतो | नव्या युगात यंत्रशक्ती महत्त्वाची |
| क्षमता | उपयोग कसा करावा आपल्या हाती |
| चांगल्यासाठीच उपयोग, मित्र | नाशासाठी उपयोग, शत्रू |

* * *

D.KUMAR'S ACADEMY

**विषय : मराठी** | **एकूण गुण : 80**

**वर्ग : 10 (Eng. Med.) PRELIM QUESTION PAPER - 03** | **वेळ : 3 तास**

## विभाग१ - गद्य १८ गुण

**प्र.१: अ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** ७

"काका, हे एक शास्त्रीय सत्य आहे. तुमच्या कार्बन सोडण्याच्या प्रमाणावरून तुमच्या पावलांचा काळा रंग ठरतो. रेखामावशींच्या रोजच्या जगण्यात कार्बन उत्सर्जनला वावच नाही. म्हणून तर त्यांची पावलं आपल्या पेक्षा अधिक सुंदर, चंदेरी आहेत", सुमित बोलत होता. "बापरे, आपण फरशी घाण होण्याची गोष्ट करतो; पण आपण तर अवघं वातावरणच घाण, प्रदूषित करत असतो. किती प्रचंड कार्बन चिकटलेला असतो, आपल्या पायांना! ग्लोबल वॉर्मिंगला हातभार लावतो आपण. तापानं फणफणलीय आपली धरती, आपल्या पायाला चिकटलेला हा कार्बन आपल्याला धुवायला हवा. मी ठरवलंय, मी कॉलेजला जाताना सायकल वापरणार. मला माझे पाय रेखामावशींसारखे चंदेरी हवेत", स्नेहल गहिवरून म्हणाली.

अभिषेक भारावून म्हणाला, "माझ्या तर कॉलेजसमोरच बसस्टॉप आहे. आजपासून मी बसनंच ये-जा करणार ठरलं एकदम!"

"खरंय पोरांनो, आजकाल चालणं, सायकल वापरणं विसरूनच गेलोय आपण. अगदी कोपऱ्यावरून भाजी जरी आणायची असली तर आपण बाईकला किक मारतो आणि पुन्हा व्यायामाकरिता वेगळं मॉर्निंग वॉकचं नाटक करतो. बसनं प्रवास करणं तर आपल्याला कमीपणाचं वाटत; पण आपल्या पायांना चिकटलेला कार्बन प्रमाणात ठेवण्या करिता पब्लिक ट्रान्सपोर्ट इज अ मस्ट", अभिषेकचे बाबा म्हणाले.

रेखामावशी सगळ्यांचे बोलणं लक्ष देऊन ऐकत होत्या. बोलता बोलता हलकेच त्यांनी आपल्या पायाचे फरशीवरचे ठसे ओल्या फडक्याने पुसून घेतले.

"पाह्यलंत, किती सहजपणे पुसले आपल्या मळलेल्या पायांचे ठसे रेखामावशींनी", सुमित म्हणाला.

**A1) कारणे लिहा.** २

i) रेखामावशींची पावलं आपल्यापेक्षा अधिक सुंदर, चंदेरी आहेत कारण - .......

ii) स्नेहलने कॉलेजला जाताना सायकल वापरण्याचा निर्णय घेतला कारण - .........

**A2) एका शब्दात उत्तरे लिहा.** १

i) बसने प्रवास करण्याचा निश्चय करणारा.

ii) सायकलने प्रवास करण्याचा निश्चय करणारी.

iii) या वाहनाने प्रवास करणे कमीपणाचे वाटत.

iv) व्यामामाकरिता याचे नाटक करता.

**A3) स्वमत :** ३

'आपल्या पायांचे वातावरणावर उमटलेले ठसे, आपल्याला सहजतेने पुसता येणार नाही,' या विधानाचा तुम्हाला कळलेला अर्थ लिहा.

**आ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** ७

कविता : 'नटसम्राट' नाटकाचे लेखक वि.वा. शिरवाडकर म्हणजेच कवीवर्य कुसुमाग्रज यांचा त्यांचया 'विशाखा' या काव्यसंग्रहाला मानाचा 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळाला आहे.

सुश्रुता : खरंच ?

कविता : कुसुमाग्रजांबरोबरच केशवसुत, बालकवी, बा.भ. बोरकर, बा.सी. मर्ढेकर, शांता शेळके, इंदिरा संत, सुरेश भट, नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे अशा अनेक कवींनी मला आपल्या प्रतिभेने सजवले. संतकाव्या पासून पंतकाव्य, मध्ययुगीन काव्य, शाहिरा काव्य अशी वळणे घेत आधुनिक काळात मी मुक्त छंदाचे रूप धारण केले आहे.

नाटक : पात्ररचना, चुरचुरीत संवाद आणि नाट्यमय घटना प्रसंग यांमुळे मी मराठी माणसाच्या हृदयात अढळ स्थान मी प्राप्त करतो. तुला माहीत आहे, माझं गमंचावर सादरीकरण होणार आहे याचे भान ठेवूनच नाटककार माझी मांडणी करतो. वाचनीय अन् प्रेक्षणीय व्हावं अशी त्याची अपेक्षा असते.

सुश्रुत : मी कालच एक धमाल बालनाट्य बघितलं. त्याचं दिग्दर्शन उत्तम होतं, असे बाबा म्हणाले.

नाटक : वाऽऽ छान! अरे, दिग्दर्शकासाठी मला दिग्दर्शित करणे हा आनंददायी अनुभव असतो. मराठी भाषेत गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कोल्हटकर, राम गणेश गडकरी, पु.ल. देशपांडे वसंत कानेटकर, मधुसुदन कालेलकर, प्र.के अत्रे अशा दिग्गज लेखकांनी मला समर्थ पणं हाताळलं.

चरित्र : अरे मी! मी चरित्र मी एखाद्या थोर व्यक्तिमत्त्वा च्या व्यक्तीचा लेखकावर प्रभाव पाडतो आणि त्याच्या आयुष्य ची गाथा लिहिण्या ची प्रेरणा लेखकाला मिळते आणि त्यातून मी जन्माला येतो.

सुश्रुत : मॅडम नेहमी म्हणतात, की थोरांची चरित्रं सामान्यां ना प्रेरणा देतात म्हणून.

A1) **जोड्या लावा.** २

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| i. ज्ञानपीठ पुरस्कार | अ. 27 फेब्रुवारी |
| ii. कवीवर्य कुसुमाग्रज | ब. चुरचुरीत संवाद |
| iii. मराठी दिन | क. सामान्यांना प्रेरणा |
| iv. नाटक | ड. वि. वा. शिरवाडकर |
| v. चरित्र | इ. विशाखा काव्यसंग्रह |

A2) **विधान पूर्ण करा** २

1) पात्ररचना, चुरचुरीत संवाद आणि नाट्यमय घटना प्रसंग यांमुळे मी ........

2) एखाद्या थोर व्यक्तिमत्त्वाच्या व्यक्तीचा लेखकावर प्रभावर पाडतो आणि .........

A3) **स्वमत :** ३


पुस्तकाशी मैत्री करण्याचे फायदे लिहा.

**इ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** ४

निसर्गाचे प्रत्येक दृश्य माणसाच्या मनाला आनंदित करणारे आहे. सूर्यास्ताच्या वेळी आकाशात अवर्णनीय शोभा दिसते. सूर्यबिंब लालभडक झालेले असते आणि मेघांच्या पटलावर संध्यारागाच्या अनंत छटा परसलेल्या असतात. किलबिलाट करीत घरट्याकडे पक्षी परतत असतात. सकाळी भिन्न भिन्न मार्गांनी उडालेले हे पक्षी संध्याकाळी मात्र गटगटाने घरट्याकडे येतात. रानावनात चरावयास गेलेली गुरेढोरे सुध्दा आतुरतेने घराकडे येत असतात. गाईची आचळं वासरांच्या ओढीने तुडूंब भरलेली असतात. अधीर होऊन हंबरतच त्या गोठ्याकडे धावतात. तेव्हा त्यांच्या गळ्यातील तो घंटानाद कानाला तृप्त करतो. त्याचवेळी त्यांच्या पावलांनी उडालेली धूळ वातावरणातील लाल रंगात मिसळते आणि वातावरणाला पवित्र करते. मंद मंद वाऱ्याच्या झुळका झाडे वेलींना हिंदळवतात. हळूहळू काळोखाची मखमल धरती पांघरते आणि सारे विश्व विश्रांतीत रममाण होते.


B KUMAR'S ACADEMY

A1) **चौकटी पूर्ण करा** २





A2) **चौकटी पूर्ण करा.** २

i)




ii)





**विभाग २ - पदय १६ गुण**

**प्र.२: अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.८**

जेवीं चंद्रकिरण चकोरांसी | पांखोवा जेवीं पिलियांसी |
जीवन जैसे कां जीवांसी | तेवीं सर्वांसी मृदुत्व ||
जळ वरिवरी क्षाळी मळ | योगिया सबाह्य करी निर्मळ |
उदक सुखी करी एक वेळ | योगी सर्वकाळ सुखदाता ||
उदकाचें सुख तें किती | सवेंचि क्षणें तृषितें होती |
योगिया दे स्वानंदतृप्ती | सुखासी विकृती पैं नाही ||
उदकाची जे मधुरता | ते रसनेसीचि तत्त्वतां |
योगियांचे गोडपण पाहतां | होय निवविता सर्वेंद्रियां ||
मेघमुखें अध:पतन | उदकाचें देखोनि जाण |
अध:पातें निवती जन | अन्नदान सकळांसी ||
तैसे योगियासी खालुतें येणें | जे इहलोकीं जन्म पावणें |
जन निववी श्रवणकीर्तनें | निजज्ञानें उद्धरी ||

A1) **आकृतिबंध पूर्ण करा** २




A2) **कोण ते लिहा.** २

1) ज्यात मधुरता आहे - ☐

2) ज्यात गोडपणा आहे - ☐

A3) **प्रस्तुत कविततेतील शब्दांचा अर्थ लिहा.** २

i) रसना -

ii) मळ -

iii) उदक -

iv) निजज्ञान -

A4) **स्वमत :** २

योगी पुरूष पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे' हे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

**आ) 'अंकिला मी दास तुझा' किंवा 'योगी सर्वकाळ सुखदाता'**

कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा

१) प्रस्तुत कवितेचा कवी/कवयित्री - (१ गुण)

२) कवितेचा विषय - (१ गुण)

३) कविता आवडण्याचा वा न आवडण्याची कारणे - (१ गुण)

४) दिलेल्या ओळींचा अर्थ लिहा.

वणवा लागलासे वनीं ।
पाडस चिंतीत हरणी ।।५।।

५) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ :

i) माता - .........

ii) कनवाळू - ........

iii) काजू - ........

iv) धेनू - .........

**किंवा**

१) प्रस्तुत कवितेचा कवी/कवयित्री

२) प्रस्तुत कवितेचा विषय

३) प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा-

जन निववी

श्रवणकीर्तनें ।

निजज्ञानें उध्दरी ।

४) प्रस्तुत कविता आवडण्याचे व न आवडण्याचे कारण

५) प्रस्तुत शब्दांचा अर्थ

i) उदक - .........

ii) मधूर - ........

iii) तृषित - ........

iv) क्षाळणे - .........

**विभाग ३ - स्थूलवाचन**

**प्र.३: खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.** ६

1) टीपा लिहा.

डॉ. होमी भाभा

2) तुम्हाला समजलेल्या सूर्याची भूमिका स्पष्ट करा.

3) 'प्रत्यक्ष अनुभवांतून शिकणे हे अधिक परिणामकारक असते', हे विधान स्वानुभवातून स्पष्ट करा.

**विभाग ४ - भाषाभ्यास (व्याकरण) १६ गुण**

**प्र.४: अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.**

**1) वाक्यांचे प्रकार ओळखा -** २

i) रोजच चिंतन करावं कसं तर झाडासारखं !

ii) तुम्ही सगळे कोण आहात ?

**2) वाक्यरूपांतर -** २

i) जमीन कोरडी आहे. (नकारार्थी वाक्य करा)

ii) दररोज अभ्यास कर. (विधानार्थी करा.)

3) खालील वाक्यप्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा. (फक्त २)

1) जीव ओवाळणे -

2) मरगळ झटकणे -

3) नाव उज्ज्वल करणे -

**आ) भाषाक घटकांवर आधारित कृती.**

1) शब्दसंपत्ती

i) लिंग बदला.

i) राजा - ............

ii) लोटा - ............

ii) विरूध्दार्थी शब्द लिहा. १

i) रिकामी × ...............

ii) ज्येष्ठ × ...............

iii) पुढील शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा. १

i) प्रशिक्षण देणारा - ..........

ii) समाजाची सेवा करणारा - ..........

iv) वचन बदला. १

रस्ता - ..........

भिंत - ..........

2) लेखननियमांनुसार लेखन

लेखननियमांनुसार बदल करा

1) "म्हणजे " बोलन्याचा आणि खाण्याचा सम्बध काय?"

2) पहिला दिवस सूरळीत गेला.

3) विरामचिन्हे - २

1) विरामचिन्हांची नावे लिहा.

| | विरामचिन्हे | नावे |
|---|---|---|
| i. | ' ' | ............... |
| ii. | ! | ............... |

2) खालील वाक्यांतील विरामचिन्हे ओळखून लिहा.

रेल्वेनं फिरायचं स्वप्न अपुरंच राहणार होतं; परंतु मन मानायला तयार नव्हतं.


**विभाग 5- उपयोजित लेखन २४ गुण**

**प्र. 5 (अ) खालील विषयावर पत्र लिहा -** 6

**खालील निवेदन वाचा व त्याखालील**

B.KUMAR'S ACADEMY

**कोणतीही एक कृती सोडवा.**




अ) १.

**किंवा**

**अनौपचारिक पत्र**

**किंवा**

2. **सारांशलेखन -**
**विभाग 1- गद्य विभागातील प्र.1 (इ) मधील अपठित उताऱ्याचा 1/3 एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

आ) **खालीलपैकी 2 कृती सोडवा. (शब्द मर्यादा 60-90 शब्द).** **10**

**(1) जाहिरातलेखन -**
**खालील शब्दांचा वापर करून एक आकर्षक जाहिरात तयार करा व तिचे पुनर्लेखन करा.**
**उपहारगृहाचे नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, विविध सेवा, सवलत, विशेष योजना**

2) **कथालेखन :**
**खालील शब्दांवरून कथा लिहा.**
**सिंह, कुत्रा आणि कोल्हा.**

3) **बातमीलेखन**


**तुमच्या शाळेत ५ सप्टेंबर रोजी 'शिक्षक दिन' साजरा झाला. या कार्यक्रमाची बातमी लिहा.**

इ) **लेखनकौशल्य** **8**


**खालील लेखनप्रकारापैकी कोणतीही एक कृती सोडवा. (शब्दमर्यादा 100 ते 120 शब्द)**

1) **वैचारिक :- 'निसर्ग आपला गुरू' या विषयावर तुमचे विचार लिहा.**

2) **दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा.**




3) **प्रसंगलेखन -**
**खालील मुद्द्यांच्या आधारे दिवाळीच्या सुट्टीत आपल्या गावी एक आठवड्यासाठी गेलेल्या तुमचा अनुभव लिहा.**




***

A-1, Ground Floor, Green Park Building Shastri Nagar, near Indian Overseas Bank,
Vasai West, Vasai-Virar, Maharashtra 401202 +91 9619619937, 0250-2334511

**विषय : मराठी** | **एकूण गुण : 80**

**वर्ग : 10 (Eng. Med.)** **PRELIM ANSWER PAPER - 04** | **वेळ : 3 तास**

## विभाग १ - गद्य १८ गुण

**प्र.१ अ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.७**

अब्दल स्टेजवर चढला. दाजीसाहेबांना फुलांचा गुच्छ आणि तपोवनातील लोकांनी तयार केलेली सुंदर फुलदाणी त्याला दिली. टाळ्यांचा कडकडाट झाला. अब्दुल अतिशय भरावून गेला. त्याने चटकन दाजीसाहेबांच्या पायांना स्पर्श केला. बराच उशीर झाला होता. अमरावतीहून आलेली निमंत्रित मंडळी मोटारीतून जाणार होती. दाजीसाहेबांनी अब्दुलला त्यात बसवले. मोटार धावत होती. अब्दुल विचार करत होता, आज शन्नूला आणायला हवे होते. तिच्या घुसा तरी कमी झाला असता. मोटार धावत होती. आकाशात अष्टमीचा चंद्र हसत होता. आकाश मेघरहित निळ्या नितळाईने नटले होते. वातावरण अंतर्बाह्य प्रसन्न वाटत होते. अंबादेवीच्या चौकात मोटार थांबली. अब्दुल खाली उतरला. घरी आला. अब्दुल येताच शन्नू उठली. थाळीत चपाती आणि वांग्याची भाजी घेऊन तिने थाळी अब्दुलसमोर ठेवली. अब्दुल एखाद्या अपराध्यासारखा मान खाली घालून जेवू लागला.

"तू नहीं खायेगी?"

"नहीं, जी नहीं चाहता खानेकू!"

"अन्वर जेवला?"

"जेवला. पण खिम्यासाठी हट्ट धरून बसला होता."

अब्दूलच्या हातातला घास हातातच राहिला. एकाएकी जेवणावरची इच्छाच मरून गेली. तोंडात घास घोळून लागला.

"कितीदा सांगितलं हा धंदा सोडून दुसरा धंदा सुरू करा. पण..."

शन्नूचे पुढचे बोलणे अब्दुलने ऐकलेच नाही. तो चटकन उठला. हात धुऊन अन्वरच्या शेजारी येऊन पडला. शन्नूचे बोलणे, त्यातला शब्दन् शब्द त्याला पाठ होता. कितीदा तरी तेच तेच ते बोलून झाले होते.

"नवीन धंदा...नवीन धंदा...भांडवल नको? कुठून आणणार?" तो थोडास जोराने पण शन्नूला ऐकायला जोईल अशा आवाजात बोलला; पण भांडवलापेक्षाही त्याला अब्बाजानपासून चालत आलेला हा बांगड्यांचा धंदा सोडवत नव्हता.

**A1) आकृती पूर्ण करा :** २

i) सत्कारानंतर अब्दुल
- [ ]
- [ ]

ii) या उताऱ्यात आकाशाचे आलेले वर्णन
- [ ]
- [ ]

**A2) घटनेनुसार वाक्यांचा क्रम लावा.** २

**i) अब्दुल खाली उतरला.**

**ii) अब्दुल अन्वरच्या शेजारी येवून पडला.**

**iii) अंबादेवीच्या चौकात मोटार थांबली.**

**iv) अब्दुल स्टेजवर चढला.**

**A3) स्वमत :** ३

**एखादा नवीन व्यवसाय / धंदा चालू करण्यासाठी कशाकशाची गरज आहे असे तुम्हाला वाटते ?**

**आ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.७**

मामा गेला तो पुन्हा परतला नाही मात्र लहानगा निरंजन मावशीच्या घरी प्रामाणिकपणे काम करायचा. घरातल्या सर्वांशी त्याने जमवून घेलं आणि शाहेत नाव दाखल केलं. मावशीची परिस्थिती यथातथाच असल्याने निरंजन वार लावून जेवायचा. पहिल्याच वर्षी त्याची अभ्यासातली प्रगती पाहून भडसावळे गुरूजींनी त्याला थोरामोठ्यांच्या घरी वार लावून दिले. दररोज एकाच्या घरी दुपारी निरंजन पाहुणा म्हणून जेवायला जायचा, मग तिथून शाळेत. संध्याकाळी मात्र मावशीकडे जे काही मिळेल त्यावर राहायचा. सकाळी लवकर उठून घरातली, गोठ्यातली सारी कामं आटपून अभ्यासाला

बसायचा. गुरुजींवर श्रध्दा ठेवायचा आण परीक्षेत पहिला नंतर पटकवायचा. त्याच्या वह्या-पुस्तकांचा खर्च भडसावळे गुरुजीच करायचे. गुरुजींनी त्याला सांगितलं, की 'जोपर्यंत तुझा पहिला नंबर आहे, तोपर्यंतच मी सारा खर्च करीन आणि वारही लावून देईन. नाहीतर नाही.' गुरुजींचं हे वाक्य लक्षात ठेवून निरंजन झटून अभ्यास करायचा.

आज नागरिकशास्त्राचा अभ्यास करत असताना आधीचे सगळे पेपर्स चांगले गेले असल्याने तो मनोमन खूश होता. नागरिकांची कर्तव्ये कोणती ? उत्तम नागरिक कुणाला म्हणावे ? लोकसभा म्हणजे काय ? ग्राम पंचायतीचा प्रमुख कोण असतो ? साऱ्या प्रश्नांची उत्तरे त्याला धडाधड येत होती. अभ्यास करता करता किती वेळ लोटला कुणास ठाऊक. निरंजन ताडकन उठून उभा राहिला. नऊ वाजून गेले होते. साडेदहाची परीक्षा. त्या आधी देशमुखांकडे जायचं होतं. केवढंतरी लांब चालायचं होतं. भराभर आवरून तो निघाला.

**A1) कोण ते लिहा.** २

**i) निरंजनचा सर्व खर्च करणारे - ..............**

**ii) निरंजनला मावशीकडे सोडून पुन्हा न परतलेला - ..............**

**iii) मावशीच्या घरी प्रामाणिकपणे काम करायचा - ..............**

**iv) मावशीची परिर्सिती यथातथाच असल्यान वार लावून जेवायचा - ..............**

**A2) ओघतक्ता तयार करा** २

**निरंजनची दिनचर्या लिहा.**

**A3) स्वमत :**

**तुम्हांला अभिप्रेत असलेली आदर्श विद्यार्थ्याची गुणवैशिष्ट्ये लिहा.**

**अपठित गदय**

**इ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.४**

शिक्षण हे पवित्र आहे आणि त्याचे पावित्र राखण्याची नितांन गरज आहे, अशी डॉ. बाबासाहेब यांची श्रध्दा आहे. शिक्षण हा एकूणच मानवी जीवनाचा पायाभूत संस्कार आहे आणि शाळा हे संस्कारकेंद्र आहे. थोर समाजचिंतकांनी 'विद्येला, 'ज्ञान'ला महत्त्व का दिले याचे इंगित हेच आहे. विद्या जीवनाला वळण देते, सुधारते. विद्येची वाढ होणे सार्वजनिक हितासाठी आवश्यक असल्याने लोकहितवादींनी प्रतिपादिले होते. नव्या ज्ञानाचे दरवाजे उघडण्यासाठी प्राचीन व्यवस्थेची चिकित्सा करणे त्यांना आवश्यक वाटत होते. गोपाळ गणेश आगरकर नव्या ज्ञानक्षेत्रासाठी व्यक्तिजाणिवांना प्राधान्य देत होते, तर महात्मा जोतीराव फुले यांनी 'विद्येविना मती गेली' असे विद्येचे महत्त्व प्रतिपादन करुन 'अविद्या हे सर्व अनर्थाचे मूळ आहे' असे सांगितले.

**A1) कोण ते लिहा.** २

**i) ज्ञानक्षेत्रासाठी व्यक्तिजाणिवांना प्राधान्य देणार - ..............**

**ii) अविद्या हे सर्व अनर्थाचे मूळ आहे असे सांगणारे - ..............**

**A2) विधान पूर्ण करा.** २

**i) शाळा हे - ....................**

**ii) 'विद्येविना - ...............**

**विभाग २ - पदय १६ गुण**

**प्र.२. अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.**

नाही मुठीमध्ये द्रव्य
नाही शिरेमध्ये रक्त'
काय करावें कळेना
नाही कष्टाचे सामर्थ्य;
जीव ओवाळावा तरी
जीव किती हा लहान;
तुझ्या शौर्यगाथेपुढे
त्याची केवढीशी शान;
वर घोंघावे बंबारा,
पुढे कल्लोळ धुराचे,
धडाडत्या तोफांतून
तुझें पाऊल जिद्दीचें;
तुझी विजयाची दौड
डोळे भरून पहावी;

B.KUMAR'S ACADEMY

डोळ्यांतील आसवांची
ज्योत ज्योत पाजळावी
अशा असंख्य ज्योतींची
तुझ्यामागून राखण;
दीनदुबळ्यांचे असे
तुला एकच औक्षण.

**A1) एका वाक्यात उत्तर लिहा.** २

**i) कवयित्रीला कोणाचे औक्षण करायचे आहे ?**

**ii) धडधडणाऱ्या तोफांतून जवानाला काय मिळते ?**

**A2) एका वाक्यात उत्तर लिहा.** २

**दीनदुबळे असे कवयित्रींनी कोणाला उद्देशून संबोधले आहे.**

**A3) प्रस्तुत कवितेता शब्दाचा अर्थ लिहा.** २

**i) कष्ट -** ...........

**ii) सामर्थ्य -** ...........

**iii) जीव -** ...........

**iv) शौर्य -** ...........

**A3) स्वमत :** २

**'नाही मुठीमध्ये द्रव्य, नाही शिरेमध्ये रक्त, काय करावें कळेना नाही कष्टाचे सामर्थ्य' या काव्यपंक्तीतील तुम्हाला समजलेला विचार स्पष्ट करा.**

**आ) हिरवंगार झाडासारखं किंवा रंग मजेचे, रंग उद्याचे या कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.**

**१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री -** (०१ गुण)

**२) प्रस्तुत कवितेचा विषय** (०१ गुण)

**३) खालील ओळींचा अर्थ स्पष्ट करा.** (०२ गुण)

**झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर**
**अलगद उतरता दवांचे टपोरे थेंब.**

**४) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे.** (०२ गुण)

**५) कवितेतून मिळणारा संदेश** (०२ गुण)

**किंवा**

**१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री -**

**२) प्रस्तुत कवितेचा विषय -**

**३) प्रसु कवितेतून मिळणारा संदेश -**

**४) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे.**

**५) प्रस्तुत कवितेतील दिलेल्या शब्दांचे अर्थ लिहा.**

**i) सृष्टी -** **ii) वृष्टी -**

**iii) दौलत -** **iv) तुष्टी -**

### विभाग ३ - स्थूलवाचन ६ गुण

**प्र.३. खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.** ६

1) **कवितेतील सूर्य आणि पणती या प्रतीकांचा तुम्हांला समजलेला अर्थ सविस्तर लिहा.**

2) **मेटलायझिंग प्रक्रियेवर लेखक डॉ. अनिल काकोडकर यांनी कसे काम केले ते तुमच्या शब्दांत लिहा.**

3) **पाठाबाहेरील उदाहरणे शोधून खालील कृती करा.**

| शब्द अनेक अर्थ एक | व्युत्पत्ती कोश | शब्द एक अर्थ अनेक |
|---|---|---|

**उदा. जल, नीर, तोय, पाण,**

**उदा. पान-झाडाचे (पर्ण) पान(पृष्ठ) पुस्तकाचे पान.**

### विभाग - ४ भाषाभ्यास १६ गुण

**प्र.४ . अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.**

**१) वाक्यांचे प्रकार ओळखा -** २

i) शाल व शालीनता यांचा संबंध काय?

ii) शेण, गोठा वगैरे जी पडतील ती सारी कामं कर.

**२) वाक्यरूपांतर -** २

i) जमीन कोरडी आहे. (नकारार्थी वाक्य करा)

ii) हे गुलाबाचे फूल खूप सुदर आहे. (उद्गारार्थी करा)

**३) खालील वाक्यप्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा. (फक्त २)** २

1) जीवाला मुकणे →

2) पारंगत असणे →

3) गहाण ठेवणे →

**आ) भाषिक घटकावंर आधारित कृती.**

**१) शब्दसंपत्ती -**

B.KUMAR'S ACADEMY

**i) लिंग बदला.** १

सेवक - ............

हरिण - ...........

**ii) विरूध्दार्थी शब्द लिहा.** १

i) विरोध × .................

ii) वृध्द × .................

**iii) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** १

i) मोजता न येण्यासारखे → ................

ii) जन्मापासून श्रीमंत →..................

**iv) वचन बदला.** १

i) पणती - ................

ii) दिवस - ..................

**२) लेखननियमांनुसार लेखन -**

**लेखननियमांनुसार बदल करा.** २

**1) आमच्या हायस्कलमध्ये दर शनिवारी चाचणी परीक्षा घेण्यात येत असे.**

**2) माझा जन्म पूण्यातच एका गरीब कूंटूंबात झाला.**

**3) विरामचिन्हे -**

**1) खालील वाक्यांत विरामचिन्हे ओळखून लिहा.** २

**बस, तेव्हापासून स्वाक्षरीच्या तालमीला सुरूवात झाली!**

**1) चुकीची विरामचिन्हे बदला**

**अरे वा? किती लवकर घरी आलास.**

**2) विरामचिन्हे ओळखून त्यांची योग्य नावे लिहा.**

| | विरामचिन्हे | नावे |
|---|---|---|
| i. | "　　" | .............. |
| ii. | , | .............. |

**विभाग ५ - गद्य २४ गुण**

**प्र.५. अ) 1) पत्रलेखन -** ६

**खालील विषयावर पत्र लिहा.**

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.**

**प्र. 5 (अ)** खालील विषयावर पत्र लिहा - **6**

**खालील जाहिरात वाचा आणि सुचनेनुसार पत्रलेखन करा.**

छात्रांक

बालकांसाठी अनोखे मासिक

वर्षभराचे सभासदत्व आजच नोंदवा

आणि मिळवा ५०% पर्यंतची आकर्षक सूट

**संपर्क**

**श्री.विश्राम गोखले (संपादक)**

**मोहमद अली रोड,बालाजी कॉम्प्लेक्स,**

**प्रथमनगर, सातारा - ४१०xxxx**

**फोन नं. - ४१०xxxx**

**Emil - - chatrankmasik@gmail.com**

| मासिकाचे वर्षभरांचे सभासदत्व नोंदवण्या करता विनंती करणारे पत्र संपादकांना लिहा | **किंवा** | छात्रांक मासिकात आपल्या मित्राची कथा छापून आल्याबद्दल अभिनंदन करणारे पत्र लिहा |
|---|---|---|

**मासिकाचे वर्षभरांचे सभासदत्त्व नोंदवण्या करता विनंती करणारे पत्र संपादकांना लिहा.**

**छात्रांक मासिकात आपल्या मित्राची कथा छापून आल्याबद्दल अभिनंदन करणारे पत्र लिहा.**

**किंवा**

**2) सारांशलेखन -**

**विभाग १ - गदय प्रं. १ (इ) उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

**आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृति करा.** १०

**१) जाहिरातलेखन (६० ते ८० शब्द)**

**खालील जाहिरात वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

चला करूया भ्रमंती

फुलपाखरांच्या जगात

नाव नोंदणी आवश्यक

त्वरा करा! त्वरा करा! त्वरा करा!

मोजक्याच जागा शिल्लक

राष्ट्रीय उद्यानातील जंगल भ्रमंती!

घेऊया फुलपाखरांच्या विश्वाचा रोमहर्षक अनुभव

वयोगट : १० ते १५, नोंदणी शुल्क - रु. २००/-

कालावधी : २५ डिसेंबर ते २७ डिसेंबर

संपर्क : जंगल भ्रमंती संस्था, तापोळा

(आयोजक)

1) जंगल भ्रमंतीसाठी नोंदणी शुल्क →
2) उद्यानात भ्रमंती करण्यासाठी वयोगट →
3) उद्यानात फिरण्याचा कालावधी →
4) जंगल भ्रमंतीचे ठिकाण →
5) आयोजक संस्थेच नाव →

**२) कथालेखन (८० ते १०० शब्द)**

**खालील मुद्यावरून कथा लिहा.**

**मुद्दे :दोन मित्र- जंगलातन प्रवास- अस्वल अंगावर धावून येते- एक जण झाडावर चढतो - दुसऱ्याला चढता येत नसते- दुसरा मेल्यासारखा पडून राहतो- अस्वल दुसऱ्या मित्राच्या अगदी जवळ जातो- मेला असे वाटून परत जाणे- पहिला मित्र झाडावरून खाली विचारतो - अस्वलाने काय सांगितले? - मित्राचे उत्तर - संकटात जो साथ देत नाही तो बेइमान मित्र - तात्पर्य.**

**३) बातमीलेखन (८० ते १०० शब्द)**

**खालील शीर्षकावरून बातमी तयार करा.**

**शाळेत वसुंधरा दिनानिमित्त वृक्षदिंडी व वृक्षारोपण कार्यक्रम, वनाधिकारी मा. श्री. शशिकांत राव यांच्या उपस्थितीत संपन्न.**

**इ) लेखनकौशल्य ८**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणत्याही एक कृती सोडवा. (शब्दमर्यादा १०० ते १२० शब्द)**

**1)**

अश्वमेध सभागृह
–दिव्यांग मुलांनी तयार केलेल्या–
–कलात्मक वस्तूंचे प्रदर्शन–
दि. १५ डिसेंबर वेळ– स. १० ते रा. ८
प्रमुख पाहुणे – श्रीमती कला परांजपे
३५ दिव्यांग व्यक्तींनी तयार केलेल्या
वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती पाहण्याची संधी.

वरील प्रदर्शन पाहण्यासाठी तुम्ही गेला होतात, अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.

**२) खालील मुद्दे विचारात घेऊन 'शेतकऱ्याचे आत्मकथन' या विषयावर आत्मकथनात्मक निबंध लिहा.**

**मुद्दे: नाव- गाव- शिक्षण शेतीच्या कामाची सवय - दिवसभर शेतात राबणे - रेडिओ- दूरदर्शनवरील माहितीचा उपयोग - नवे शोध- तंत्रे- बी-बीयाणे-अवजारे- नवी पिढी सुशिक्षित- शेती करायला तयार नाही- काही अपेक्षा.**

**३) कोरोना संकट**

**मुद्दे : उगम - दुष्परिणाम संकटाची - काय शिकलो- सुपरिणाम व्याप्ती.**

***

B.KUMAR'S ACADEMY

# B.KUMAR'S ACADEMY

**विषय : मराठी** **एकूण गुण : 80**

**वर्ग : 10 (Eng. Med.) PRELIM ANSWER PAPER - 05** **वेळ : 3 तास**

### विभाग १ - गद्य १८ गुण


**प्र.१ अ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.७**

साखरेत सर्वात अधिक कॅलरीज असतात. म्हणून प्रथम बिनसाखरेचा चहा सुरू केला. पहिल्या दिवस विशेष फरकही वाटला नाही. घरात साखरबंदी जाहीर केली. कुटुंबाला सारी दिवाळी तिखटामिठावर उरकायची सक्त ताकीद दिली. ''मुलांसाठी म्हणून काय थोडं गोडाधोडाचं करायचं ते कर.'' एवढी सवलत ठेवली. पहिल्या दिवशीचा मला फरक जाणवाया लागला. भात अजिबात वर्ज्य करणे अवघड होते. म्हणून फक्त पहिला भात आणि ताकभात ठेवून मधला भात वर्ज्य केला. नुसती उकडलेली पालेभाजी खाणे कसे जमणार हा विचार किती पोकळ होता, याचा अनुभव ती खाल्ल्या वर आता आणि नेहमीच्या भाजीत 'ही' निराळे काय करते याचा अजूनही अंदाज आला नाही.

पहिला दिवस सुरळीत गेला आणि दुसऱ्या दिवशी व्रतभंगाचा प्रसंग आला. पहिल्या दिवशी निम्म्या हून अधिक कचेरीला माझ्या वजन घटवण्याच्या व्रताची वार्ता गेली होती; परंतु दुसऱ्या दिवशी आमच्या अण्णा नाडगौडाला प्रमोशन मिळाल्या ची वार्ता आली आणि त्याने साऱ्या सेक्शनला पार्टी दिली. कँटीनच्या आचाऱ्या ने तर माझ्या 'डायट' वर सूड घ्यायचा असे ठरवून पदार्थ केले होते. बरे, न खावे तर अण्णा नाडगौडाला वाईट वाटणार! बिचारा सहा वर्षांनी 'एफिशिएन्सीबारच्या जाळ्यातून बाहेर पडला होता. आचाऱ्याने मिठाईत साखर न घालता साखरेत मिठाई घालून आणली होती. घासाघासागणिक सहस्रावधी कॅलरीज पोटात चालल्या होत्या, त्यामुळे खाल्लेले गोड लागत नव्हते. बटाटेवडे होते-म्हणजे आणखी कॅलरीज. चिवडा अस्सल 'वनस्पतीतला, त्यामुळे आणखी कॅलरीज आणि एवढे सगळे हादडून शेवटी 'भज्यांशिवाय पार्टी कसली?' या भिकोबा मुसळ्याच्या टोमण्यामुळे चेकाळून नाडगौडाने स्पेशल भज्यांची परत ऑर्डर दिली.

शेवटी मला राहवेना. भज्यांची सहावी प्लेट उडवल्यावर, मी अत्यंत केविलवाण्या स्वरात 'सध्या मी 'डाएट' वर असल्याचे सांगितल्यावर सर्वांनी मला वेड्यात काढले.

**A1) आकृती पूर्ण करा :** **२**




**A2) एका वाक्यात उत्तर लिहा.** **२**

i) लेखकाला अजिबात वर्ज्य करणे काय अवघड होते

ii) दूसऱ्या दिवशी लेखकावर कोणता प्रसंग आला ?

**A3) स्वमत :** **३**

तुम्ही केलेल्या संकल्पात/प्रतिज्ञेत कुटूंबाकडून मिळालेल्या सहकार्याचे वर्णन करा.

**आ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.**

पंधरवडाभरात फक्त दोन वेळाच साखरभात झाला. एकदा सोकाजीने चोरून कोळंबीभात चारला व खालच्या मजल्यावरच्या भाऊजी पसरटवारांनी एकदा नागपुरी वडाभात पाठवला होता. एवढे अपवाद वगळल्यास भाताला स्पर्श नाही केला. त्यामुळे चरबीयुक्त द्रव्ये शरीरात कमी गेली. माझा एकुण निश्चय पाहून चाळीतल्या मंडळीच आदर दुणावल्याचे माझ्या सूक्ष्म नजरेतून सुटत नव्हते. जी मंडळी माझी, माझ्या डाएटची आणि उपासाची चेष्टा करत होती त्यांनीच ''पंत परक दिसतो ही' अशी कबुली द्यायला सुरूवात केली.

जनोबर रेग्यांसारख्या अत्यंत कुजकट शेजाऱ्यालाही ''पंत, भलतेच काय हो रोडावलेत.'' असे मान्य करावे


लागले. मंडळींच्या प्रशस्तीने मला भीती होती ती एकाच गोष्टीची म्हणजे मूठभर मांस वाढण्याची; पण असली तुरळक तारीफ ऐकून मी चळण्यासारखा नव्हतो.

इतका असामान्य मनोनिग्रह आणि जिव्हानियंत्रणानंतर कमीत कमी वीस ते पंचवीस पौंडांनी तरी माझे वजन घटले पाहिजे अशी माझी खात्री होती व त्या खात्रीने मी आमच्या ऑफिससमोरच्या वजनाच्या यंत्रावर पाय ठेवला आणि आणेली टाकून तिकीट काढले. महिन्यापूर्वी याच यंत्राने माझे वजन एकशे एक्याऐंशी पौंड दाखवले होते. एक महिन्याचा उपास, निराहार, शास्त्रोक्त आहार, दोरीवरच्या उड्या इत्यादी उग्र साधना केल्यावर आज तिकिटावर वजन...

मिनिटभर माझा विश्वासच बसेना. एकशे ब्याण्णव पौंड आणि भविष्य होते : 'आप बहुत समझदार और गंभीर है !

हल्ली मी वजन आणि भविष्य या दोन्ही गोष्टींची चिंता करायचे सोडून दिले आहे आणि विशेषत: डाएटच्या आहारी तर या जन्मात जाणार नाही. छे.छे. वजनाचा मार्ग भलत्याच काट्यातून जातो.

**A1) आकृती पूर्ण करा :** २




**A2) कारणे लिहा.** २

i) एक महिन्याचा उपास, निरहार, शास्त्रोक्त आहार, दोरीवरच्या उड्या इतकी तीव्र साधना केली, कारण...

ii) चाळीतील लोकांचा आदर दुणावल्याचे लेखकाच्या लक्षात आले, कारण.....

**A3) स्वमत :**

लेखकाने आपले आहारव्रत कसे चालू ठेवले होते ते तुमच्या शब्दांत लिहा.

<u>**अपठित गदय**</u>

**इ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** ४

स्वमी विवेकानंदांच्या बोलण्यानं रविवर्म्यांचं भान हरपत होतं. काही न बोलता त्याच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते. शब्दांचे भान त्याला उरलं नव्हतं. ते घायाळ रूप पाहून स्वामीजींनी रविवर्म्याला मिठीत घेतले. ते आपल्या मृदू आवाजात म्हणाले, 'कोच्चू बेटा, सावध हो. कलावंतानं भावनेच्या आहारी जरूर जावं. पण विवेकाचं भान कधी विसरू नये. स्वामीजी आसनस्थ झाले. गोद वर्मा, राजवर्मा यांनी पाद्यवूजस केली. हे सर्व चालले असताना चेतू रविवर्म्याला आता. येण्याबद्दल खुणावत होता. त्रस्त मनानं रविवर्मा आंत गेले. आत जाताच चेतूनं रविवर्म्याचे पाय धरले. त्याला उठवत संतापानं रविवर्मा म्हणाले, "चेतू! हा काय चावटपणा चाललाय? काय झाले." चेतू डोळ्यातले पाणी पुसत म्हणाला, "स्वामी, तुमच्यामुळे देवदर्शन घडले. त्यांना आज घरात ठेवून घ्या. माझ्या गरिबाच्या हातचे चार घास त्यांनी स्वीकारले तर माझी कुळी उद्धारेल." चेतूचं सारं शरीर बोलताना गदगदा हलत होतं. त्याचं ते रूप पाहून रविवर्मा सुध्दा व्याकुळ बनला. तो म्हणाला, "चल'. आणि चेतूच्या दंडाला धरून बळजबरीनं त्यानं त्याला बैठकीच्या खोलीत आणलं. स्वामीजींच्या पायावर चेतूनं साष्टांग दंडवत घातला. रविवर्मा म्हणाला, "हा आमचा चेतू, माझा स्वयंपाकी, त्याचा आग्रह आहे की, आज आपण इथं राहावं. त्यानं केलेल्या भोजनाचा आस्वाद घ्यावा. विवेकानंद मुक्तपणे हसले. त्याला उठवण्याचा प्रयत्न करीत ते म्हणाले. "अरे चेतू! ऊठ! पण विवेकानंदांचे पाय न सोडता चेतू म्हणाला. "आपण हो म्हटल्याखेरीज हे पाय सोडणार नाही." "अरे बाबा! आम्ही फक्त फलाहार घेतो. पण तुझा आग्रह आहे तर, जरूर आम्ही भोजन घेऊ! पण आमची काही पथ्यं आहेत. माझा शिष्य आनंद आहे ना! तो सारं तुला सांगेल." चेतू आनंदानं उठला त्यानं आपले डोळे टिपले. सारे त्याच्याकडे कौतुकानं पाहात होते. त्या नजरेनं लाजलेला चेतू आतमध्ये निघून गेला.

**A1) एका वाक्यात उत्तर लिहा.** २

i) स्वामी विवेकानंद यांच्या शिष्याचे नाव काय ?

ii) रविवर्म्याला स्वयंपाक घरात बोलवणारा - .........

**A2) शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.** २

i) जेवणाबाबत नियम यासाठी आलेला शब्द -

ii) सांसारिक जीवन सोडून आध्यात्म क्षेत्रातील व्यक्ती -

iii) फक्त फळे व कंदमुळे यांचे भोजन -

iv) पाहुण्यांच्या पावलांची पूजा -

B.KUMAR'S ACADEMY

A-1, Ground Floor, Green Park Building Shastri Nagar, near Indian Overseas Bank, Vasai West, Vasai-Virar, Maharashtra 401202 +91 9619619937, 0250-2334511

## विभाग २ - गद्य १६ गुण

**प्र.२. अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** ८

दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले.
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
शेकडो वो चंद्र आला; तारे फुलते. रात्र धुंद झाली;
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.
हे हात माझे सर्वस्व; दारिद्याकडे गहाणच राहिले
कधी मनात उंचावलेले, की कलम झालेले पाहिले
हरघडी अश्रु वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले
तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले.
दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो
दु:ख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो
झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले.

**A1) खालील शब्दसमूहांचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.**

i) माना उंचावलेले हात - ☐

ii) दारिद्र्याकडे गहाण पडलेले होत - ☐

**A2)एका वाक्यात उत्तर लिहा.** २

i) कवीचे सर्वस्व असलेली गोष्ट -

ii) कवीचा जवळचा मित्र -

**A3) प्रस्तुत कवितेता शब्दाचा अर्थ लिहा.** २

i) साहाय्यास - ...........

ii) मित्र - ...........

iii) तारे - ...........

iv) गहाण - ...........

**A3) काव्यसौंदर्य :** २

'हरघडी अश्रू वाळविले नाहीत;
पण असेही क्षण आले,
तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यस धावून आलेश'
या ओळींचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.

**आ) 'अंकिला मी दास तुझा' व 'औक्षण'**

**कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.** ८

१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री -

२) प्रस्तुत कवितेचा विषय

३) प्रस्तुत ओळीचा अर्थ लिहा.

'अग्निमाजि पडे बाळू ।
मता धांवें कनवाळू ॥'

४) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे.

५) प्रस्तुत शब्दांचे अर्थ लिहा.

i) काम ii लगेच

iii) हरिणींचे पिल्लू iv) गाय

किंवा

१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री -

२) प्रस्तुत कवितेचा विषय

३) प्रस्तुत ओळीचा अर्थ लिहा.

जीव ओवाळावा तरी, जीव किती हा लहान तुझ्या शौर्य गाथेपुढे त्याची केवढीशी शान

४) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे.

५) प्रस्तुत शब्दांचे अर्थ लिहा.


i) जीव ii शौर्य

iii) सान iv) आसवे

## विभाग ३ - स्थूलवाचन ६ गुण

**प्र.३. खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.** ६

1) **टिपा लिहा.**




2) तुम्हाला समजलेली कवितेतील सूर्याची भूमिका स्पष्ट करा. (किंवा) 'जाता अस्ताला' या कवितेतील सूर्याची भूमिका स्पष्ट करा.

३) पणतीच्या उदाहरणातून 'जात अस्ताला' या कवितेत व्यक्त झालेला विचार स्पष्ट करा.

B.KUMAR'S ACADEMY

## विभाग - ४ भाषाभ्यास १६ गुण

**प्र.४ . अ) पुढील ओळींचे रसग्रहण करा.** ८

**१) वाक्यांचे प्रकार ओळखा -** २

i) तुम्ही सर्वजण संशोधन करत रहा.

ii) तपोवनाकडे कोण जातोय कशाला ?

**२) वाक्यरूपांतर -** २

i) रेखामावशींचे पाय स्वच्छ आहेत. (नकारार्थी करा)

ii) लाडू चांगले आहेत. (उद्गारार्थी करा)

**३) खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यत उपयोग करा. (फक्त २)** ४

1) कीव येणे →

2) ऋण असणे →

3) पारंगत असणे →

**आ) भाषिक घटकावंर आधारित कृती.** ८

**१) शब्दसंपत्ती -**

**i) लिंग बदला.** १

लांडगा - ............

विद्यार्थी - ...........

**ii) विरूध्दार्थी शब्द लिहा.** १

i) काळी × ...............

ii) देशी × ...............

**iii) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** १

i) कमी आयुष्य लाभलेला → ...............

ii) मोजता न येण्यासारखे →.................

**iv) वचन बदला.** १

i) चेंडू - ...............

ii) छत्री - .................

**२) लेखननियमांनुसार लेखन -**

**लेखननियमांनुसार बदल करा.** २

1) परवा सुट्टी काडून घराकडे गेलो होतो.

2) दोन महीन्यात पन्नास पौंढ वजन कमी करेन

**3) विरामचिन्हे -** २

1) चुकीची विरामचिन्हे बदला

अरे वा? किती लवकर घरी आलास.

2) विरामचिन्हांचा योग्य वापर करा.

**सुमित अरे पाय स्वच्छ आहेत की नाही हे सांगायला ॲपची काय गरज आहे.**

## विभाग ५ - गद्य २४ गुण

**प्र.५. अ) 1) पत्रलेखन -** ६

**खालील विषयावर पत्र लिहा.**

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.**

**खालील विषयावर पत्र लिहा.**

**'जागतिक आरोग्य दिन'**
**'डास निर्मूलन मोहीम'**
या उपक्रमात सहभागी व्हा
**संपर्क-** आरोग्याधिकारी महानगरपालिका,मुंबई

नागरिकांना आवाहन-आपल्या परिसरात कचराकुंड्या स्वच्छ नसतील तर तेथील रहिवाशांनी आरोग्याधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

**नगरसेविका या नात्याने**

| अ | ब |
|---|---|
| कचराकुंड्या व परिसर नियमित स्वच्छ करण्यासाठी महानगरपालिकेला विनंती पत्र लिहा. | महानगरपालिकेकडे डास निर्मूलन करण्यासाठी मच्छरविरोधी फवारणीची मागणी करणारे पत्र लिहा. |

**अ) कचराकुंड्या व परिसर नियमित स्वच्छ करण्यासाठी महानगरपालिकेला विनंती पत्र लिहा.**

**किंवा**

B.KUMAR'S ACADEMY


**सारांशलेखन -**

विभाग 1 - गद्य प्र.1 (इ) उतारा वाचा व त्याचा एक तृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृति करा.** १०

**१) जाहिरातलेखन (६० ते ८० शब्द)**

खालील शब्दांचा आधार घेऊन आकर्षक जाहिरात तयार करा.




**२) कथालेखन**

एक गरीब मुलगा-शाळेची फी भरण्यास पैसे नसणे-सकाळी पेपर टाकण्याचे काम-वाटेत पैशाचे पाकीट मिळणे-प्रामाणिकपणे पोलिस स्टेशनवर पैसे नेऊन देणे- पाकिटाच्या मालकास आनंद- बक्षीस


**3) बातमी लेखन (80 ते 100 शब्द)**

खालील समारंभाची बातमी तयार करा.
शाळेच्या सुवर्ण महोत्सवाचा उद्घाटन समारंभ माननीय शिक्षणमंत्री यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.


**इ) लेखनकौशल्य** ८

खालील लेखनप्रकारांपैकी कोणत्याही एक कृती सोडवा.
(शब्दमर्यादा १०० ते १२० शब्द)

१)




**2) चौकटीत दिलेल्या घटकाचे आत्मकथन लिहा.**




**3)** 'वतर्मानपत्रे बंद झाली तर!' या विषयावर खालील मुद्द्यांच्या आधारे तुमचे विचार लिहा:
काळाची गरज- याचे महत्त्व- याचे-फायदे/ तोटे-समाजात याचा सदुपयोग.

***

B.KUMAR'S ACADEMY